# सर्व स्पर्शी पाणी समस्या

**डॉ. बी.एस. भिंगोले**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
श्री. स्वामी योगानंद कला महाविद्यालय,
वसमत जि. हिंगोली

---

पाणी हेच जीवन आहे, असे नेहमीच म्हटले जाते. पाण्याविना पृथ्वीवर मानवी जीवनाची कल्पनाही करवत नाही. आज मानव चंद्रापासून ते मंगळाच्या पृष्ठभूमीवर पाण्याचा साठा आहे किंवा नाही हे जाणून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे जेणेकरून तेथे मानव जीवनाची शक्यता पडताळून बघता येईल. परंतु, पृथ्वीवर वास्तव्य करणारे आम्ही निसर्गाने अगदी मोफत दिलेल्या अमूल्य अशा पाण्याचे महत्त्व जाणतो का? म्हणतात की पाणी जेवढे प्याल तेवढे कमीच आहे. परंतु, ही बाब खरोखरच पूर्णपणे सत्य आहे का?, असे विचारले तर त्याचे उत्तर नाही असेच येईल. गरजेपेक्षा जास्त पाणी पिणेदेखील आरोग्यास घातक ठरू शकते. कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात करणे केंव्हाही धोकादायकच आणि पाणीदेखील त्याला अपवाद नाही. पाणी कार्बोहायड्रेट्स, प्रोटिनसारखे पोषणाचे काम करत असते.

जिवांना ज्या वस्तूची ज्या प्रमाणामध्ये गरज असते त्या प्रमाणात निसर्गाने ते तत्त्वही त्याच प्रमाणात उपलब्ध करून दिले आहे. परंतु, सध्याचा विचार करता पाणी आणि वायू या दोन्ही गोष्टींबाबत गंभीर संकट निर्माण झाले असेल तर आम्ही नक्कीच कुठे ना कुठे चूक केली हे समजून घेण्याची गरज आहे. पाणी हा तरल पदार्थ आहे जो ठोस आणि वायू स्वरूपातही उपलब्ध आहे. अवस्था परिवर्तन करण्याचा पाण्याचा हा स्वभाव त्याच्या उपयोगाच्या आयामांना विस्तृत करतो. पाणी जर बर्फ बनून राहू शकले नसते तर गंगेसारख्या पवित्र नद्या अस्तित्वात नसत्या आणि पाण्याचे वायू बनून बाष्पिभवन झाले नसते तर पृथ्वीवर पाऊस पडण्याची कोणतीही शक्यता नव्हती. परंतु, ज्या वस्तूला तो व्यवहारात आणतो ती दूषित करून टाकतो, हा मानवी गुणधर्मच आहे. त्यामुळेच आज नद्या सुकल्या आहेत, भूमिगत जलसाठे असलेल्या विहिरी कोरड्या पडल्या आहेत, केवळ समुद्रच नव्हे तर पावसाचे पाणीही कमी अधिक प्रमाणात दूषित झाले आहे. वाढत्या जल प्रदूषणावर अनेक चर्चासत्र, परिसंवाद वगैरे असंख्य गोष्टी आयोजित केल्या जातात. परंतु, या विश्वव्यापी समस्येवर कोणताही ठोस तोडगा काढण्यात अद्याप यश आलेले नाही.

नैसर्गिक स्रोतांचे पेटेंट केले जावे, असाही प्रयत्न सुरू आहे. याचाच अर्थ असा की, विशिष्ट नदी किंवा धरणावर एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचा अधिकार असावा आणि त्या कंपनीने या साठ्यातील पाणी बाटल्यांमध्ये बंद करून ते मिनरल वॉटर म्हणून बाजारात विकणे यामध्ये अभिप्रेत आहे. याबाबत सरकारचा सकारात्मक दृष्टिकोन होता, परंतु पर्यावरणवाद्यांनी याविरुद्ध आवाज उठवल्यानंतर सरकारने याबाबत मौन धारण केल्याचे बोलले जाते. ज्याप्रमाणे प्रत्येक वस्तूवर बाजारवादाचा प्रभाव आहे तो बघता नद्या आणि इतर जलाशये या कंपन्यांपासून किती काळ मुक्त राहू शकतील, असा प्रश्नच आहे. सरकारे आपल्या वाढत्या खर्चाच्या भरपाईसाठी विविध क्लृप्त्या शोधत आहे.

पृथ्वीचा सुमारे 71 टक्के भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. मानवासह भूतलावर असलेल्या सर्वच प्राण्यांसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. मात्र, असे असले तरी पिण्याचे स्वच्छ पाणी खूपच कमी प्रमाणात उपलब्ध आहे. सुरक्षित पाण्याचा अभाव म्हणजेच दुष्काळ. आजही देशाच्या अनेक भागांमध्ये पाण्याचा दुष्काळ असून, त्या भागातील जनतेला पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे हे एक फार मोठे आव्हान आहे. पाण्याच्या अभावामुळे लोकांना अनेक दैनंदिन समस्यांना तोंड द्यावे लागते. दुष्काळी भागातील लोकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी खूप प्रयत्न, पैसा आणि वेळ लागतो. केवळ भारतच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. ज्या लोकांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध आहे त्यांना आपण दररोज अनावश्यक कारणांसाठी जो पाण्याचा अपव्यय करतो त्याचे महत्त्वच लक्षात येत नाही.

आपणा सर्वांना याची कल्पना असेलच की, पृथ्वीवरील फक्त दोन टक्के पाणी शुद्ध आणि मानवाने सेवन - प्राशन करण्यासाठी उपयुक्त आहे. बहुतांश पाणी ग्लेशियर, बर्फ आणि इतर खुल्या स्रोतांमध्ये अडकले आहे. भूजल हा शुद्ध पाण्याचा मुख्य स्रोत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तिथे पाण्याचे शुद्धीकरण करण्याची नैसर्गिक प्रक्रिया उपलब्ध असते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जागतिक हवामान बदल, प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग या विविध कारणांमुळे भूजलाची पातळी दिवसेंदिवस खाली जात असून, नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळामुळे स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता वाढत आहे. वाढती लोकसंख्या, कृषी व औद्योगिक क्षेत्राची वाढती गरज लक्षात घेता येणाऱ्या दशकांमध्ये स्वच्छ पाण्याच्या पुरवठ्याच्या मागणीत वाढ होणार हे निश्चित.

ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता शक्य तेवढे पाणी वाचविण्यासाठी आम्ही एकत्र येऊन प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. दैनंदिन जीवनात पाणी वाचविण्याचे अनेक उपाय आहेत. जल संवर्धनाच्या वेगवेगळ्या पद्धतींनुसार पाणी वाचविले जाऊ शकते. वर्तमान आणि भविष्यातील गरज भागवायची असेल तर पाणी वाचविण्यासह ते प्रदूषित होणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. येणाऱ्या पिढ्यांना पाणी उपलब्ध होईल हे सुनिश्चित करण्यासाठी आज ते वाचविणे आवश्यक आहे. जर आम्ही आजच या दृष्टीने सकारात्मक पावले उचलली नाहीत तर नैसर्गिक स्रोतांपासून मिळणाऱ्या शुद्ध पाण्याची कमतरता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. पाण्याची गरज कमीत कमी करुन आम्ही केवळ मानवालाच नव्हे, तर शुद्ध पाण्याचे स्रोत, स्थानिक वन्यजीव आणि स्थलांतरित पक्ष्यांनाही वाचवू शकतो. यादृष्टीने पाण्याचा प्रत्येक थेंब न थेंब वाचविण्यासाठी आम्हाला आमच्या सवयींमध्ये अनेक सकारात्मक बदल घडवून आणावे लागतील.

**पाण्याची समस्या गंभीर**

आपल्या देशापुढचा पाण्याचा प्रश्न कधी सुटणार याची वाट आपण सर्व पहात आहोत परंतु तो प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गंभीर होत आहेगंमतीचा भाग असा की देशात सर्वात जास्त पाऊस पडत असूनही . सालपासून प्रत्येक निवडणुकीतल्या जाहीरनाम्यात १९५२ सरकारने . वरचेवर कठीण होत आहेपाण्याचा प्रश्न सन दिले आहे तजनतेला स्वच्छ आणि भरपूर पाणी देण्याचे आश्वारी 16 पैकी एकाही निवडणुकीत या सरकारला आपण हे आश्वासन पूर्ण केलेय असे छातीठोकपणे सांगता आलेले नाही इतका तो अवघड होऊन बसला आहे . च विसंगतीत आणखी एक विसंगती म्हणजे पाण्याच्या समस्येचा त्रास सर्वाधिक प्रमाणात ज्यांना होतो या साऱ्या

त्यांना या पाण्याच्या शुद्धत ेसाठी आपणही काही केले पाहिजे याची यत्किंचितही जाणीव नाहीतेच लोक . पाण्यात गणपती टाकत आहेत .पाणी वरचेवर घाण करीत आहेत, पाण्यात निर्माल्य टाकत आहेत आणि कधीही न कुजणाऱ्या वस्तू त्यात टाकून ते कधीच शुद्ध होणार नाही याची दक्षता घेत आहेतपाण्याला जीवन म्हटले . ज ाते पण आपण आपल्या हाताने त्याला आपले मरण करून टाकले आहेपिण्याचे शुद्ध पाणी मिळत . याबाबत आपण नेमके कोठे . निर्माण होत आहेतनसल्याने ग्रामीण भागातल्या जनतेच्या आरोग्याचे अनेक प्रश्न आहोत याचा शोध घेण्यासाठी केन्द्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने देशभरातल्या ग्रामीण भागातल्या पाण्याचे नमुने तपासले या तपासणीत पाच टक्के नमुन्यांतले पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे दिसून आलेया . शहरांत मोठ्या .पाण्यात निरनिराळी रसायने मिसळली असल्याने ते वापरण्यास अयोग्य असल्याचे दिसून आले प्रमाणावर कारखाने असतात आणि त्यांचे सांडपाणी सरळ गटारात सोडून दिले जातेपण खेड्यात काही . मग गावांतल्या पाण्यात रसायने .कारखाने नसतात आणि जलाशयांत रसायने सोडली जाण्याची शक्यता नसते कोठून आली? पहिले कारण म्हणजे खोलवर खोदल्या गेलेल्या विहिरी आणि कूपनलिकाग्रामीण भागात त्यांना . प्रत्येक वर्षी पडणारा पाऊस आहे तेवढाच आहे पण त्या पावसाच्या पाण्याचे जमिनीत .बोअरिंग म्हटले जाते त्या मानाने पाण्याचा उपसा जास्त आहे म्हणून जमिनीच्या आतल्या पाण्याची पातळी .मुरण्याचे प्रमाण कमी आहे पातळी कितीही खाली गेली तरीही पाणी आवश्यकच आहे मग ते पाताळा .खाली खाली जात आहेत जाऊन वर काढावे लागले तरी काही हरकत नाही म्हणून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून खोलवरचे पाणी वर काढणे सुरू झाले आहेती पाण्यात मिसळतात आणि तेच पाणी पिण्यासाठी वापरले .जमिनीच्या या थरात काही रसायने आहेत . आणखी एक कारण म्हण .असे पाणी पिल्याने सांधे धरतात .जातेजे शेतात वापरली जाणारी रासायनिक खतेजी . साखर कारखान्यांची मळी पाण्यात मिसळली जाणे .शेतात दिली जातात पण ती नंतर पाण्यात मिसळली जातात अशा प्रकारे केवळ रसायनांमुळे दूषित झालेल्या पाण्याचा त्रास देशातल्या .हा प्रकारही आता वाढत चालला आहे लाख लोकांना ६४ चार कोटी होत आहेमहाराष्ट्रात साखर कारखान्यांच्या परिसरात राहणारे लोक या प्रकारात . मोडतातच पण राजस्थान, बिहार आणि आसाम या राज्यांत हा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहे .

केन्द्र सरकारने या लोकांना मदत म्हणून बाराव्या योजनेत ११ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत पण या पैशांनी काही साध्य होणार नाहीदेशातल्या . पाण्याचा स्रोतच प्रदूषित आहेतकारण त्यांना दिल्या जाणाऱ्या . माणसाला जगायला पाणी लागतेच पण .नदी हा पाण्याचा मुख्य स्रोत असतो .अनेक नद्याच प्रदूषित आहेत म्हणून मानवी प्रगती प्रामुख्याने नद .विकास करायलाही पाणी लागते ्यांच्या काठीच झालेली दिसतेआपण . मानवाने नदीच्या साह्याने प्रगती .पाण्यापासून किंवा धरणांपासून जसजसे दूर जाऊ तसे प्रगती कमी झालेली दिसते प्रगती करण्यासाठी रासायनिक खते वापरली पण ती खते .केली पण नदीच्या पाण्याची शुद्धता सांभाळली नाही .नदीच्या पाण्यात सोडलीकारखाने काढले पण कारखान्यांतून बाहेर पडणारे पाणी नदीच्या पात्रात सोडले . .परिणामी ज्यांच्या साह्याने प्रगती करायची त्याच लोकमतांना आपण गटारीची कळा आणली

शहरातल्या लोकांना थेट पाणी आणावे लागत नाही .त्यांना महानगरपालिका घरपोच पाणी देतात . त्यासाठी पैसेही अगदीकमी घेतात ते १५शहरातली हीच मंडळी बाहेर पडल्यावर एका पाण्याच्या बाटलीसाठी . रुपये खर्चतात पण महानगरपालिकेकडून पाणी घेताना मात्र त्यांना एक रुपयाला एक हजार बाटल्या पाणी २० पण खेड्यातल्या लोकांना लांबून पा .म्हणून त्यांना पाण्याची किंमत कळत नाही .दिले जात असतेणी आणावे

लागतेत्यामुळे त्यांना तरी .शेताला पाणी लागते आणि ते न मिळाल्यास काय होते याचा त्यांना अनुभव असतो . पाण्याची किंमत कळायला हवी पण आता आता तेही निष्काळजीपणा करायला लागले आहेत आणि तेही लोकमतांना गटार समजून त्यांच्या पाण्यात मैल्यापासून साखर कारखान्यांच्या मळीपर्यंत सर्व काही सोडायला लागले आहेतग्रामीण भागात अशुद्ध पाणी वापरून पोटाचे विकार होऊन मरणारांची संख्या वरचेवर वाढत . आपण .अशा मरणारांची संख्या दरसाल वेगाने वाढत आहे .असल्याचे आरोग्य खात्यानेही कळवले आहे पाण्याच्या बाबतीत एवढे निष्काळजी असल्यामुळेचआपल्याला या संकटांना तोंड द्यावे लागत आहे तेव्हा आपण आपली जलाशये शुद्ध ठेवली पाहिजेत याची जाणीव या देशातल्या लोकांना राहिलेली नाही.

आज जगातील अनेक देशांमध्ये पाण्याचे गंभीर दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. मात्र, सर्वच लोकांचे जीवन हे पाण्यावरच अवलंबून आहे. निसर्गाचे चक्र बिघडल्यामुळे पिण्याच्या पाण्याची भूजल पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे. वनांची आणि वृक्षांची कमतरता यामुळे पावसाचे पडणारे पाणी पृथ्वीच्या पोटात जाण्याऐवजी दूर जाते. काहीही झाले तरी ही परिस्थिती आम्हाला बदलावीच लागेल.

गेल्यावर्षी वरुण राजाने महाराष्ट्रावर कृपा केली असली तरी त्याआधीची तीन-चार वर्षे आपल्याला भीषण दुष्काळाचा सामना करावा लागला. राज्यातील अनेक सिंचन प्रकल्प रखडल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी व इतर कामांसाठी पाणी उपलब्ध होऊ शकले नाही. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजपा सरकार अस्तित्वात आल्यानंतर या सरकारने राज्यातील अवर्षणग्रस्त भागांना कायमचे दुष्काळमुक्त करण्यासाठी अनेक योजना राबविल्या. त्यामध्ये प्रमुख ठरली ती जलयुक्त शिवार योजना. जलयुक्त शिवार योजनेचे फायदे यंदा दिसतील अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही. याशिवाय मागेल त्याला शेततळे, विहिरींसाठी अनुदान या इतर योजनांच्या माध्यमातून फडणवीस सरकारने कायमच्या दुष्काळमुक्तीसाठी प्रयत्न सुरू केले हीच प्रक्रिया महा विकास आघाडी सरकारने सुद्धा पुढे कार्यान्वित केलेली आहे हे ही या ठिकाणी विशद करताना मला मनस्वी आनंद होतो आहे. यंदा अंदाज वर्तविल्याप्रमाणे जर मान्सूनच्या पावसावर फारसा परिणाम जाणवला नाही तर या सर्व योजना किती फायदेशीर आहेत याची आपल्याला प्रचिती येऊ शकते. याशिवाय आमिर खान व इतर मराठी कलावंतांनी देखील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून या कामी हातभार लावला आहे.

राज्य शासन नुसते योजना राबवून थांबले नाही तर पाणी हे किती अमूल्य आहे याबाबत जनजागृती करण्यासाठी शासनाने गेल्या वर्षीपासून जलजागृती सप्ताहाचे आयोजन सुरू केलेले आहे. या जल जागृती सप्ताहाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न जागोजागी केला जात आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये पाण्याबाबत जागरुकता निर्माण करून पाण्याचा अपव्यय टाळण्यासह त्याचा काळजीपूर्वक वापर करण्याबाबत जागृती केली जाते. शासनाच्या या उपक्रमाला राज्यभरात भरभरून प्रतिसाद मिळाला असून सामान्यांना पाण्याचे महत्त्व कळून आले असेल अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही.